प्रधानमंत्री पीक विमा योजना रब्बी हंगाम सन २०१८-१९ साठी राज्य शासनाच्या हिश्याची पिक विमा हप्ता अनुदानापोटी तसेच प्रशासकीय खर्चासाठी लागणारी रु.२७१,५४,६९,९३१/- इतकी रक्कम वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रपिवियो-२०१८/प्र.क्र.१८०/११ अे,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: १९ जुलै, २०१९

वाचा -

१. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र. ४४ /अर्थ-३, दि.०१.०४.२०१९
२. कृषि व पदूम विभाग शासन निर्णय क्र.प्रपिवियो-२०१८/प्र.क्र.५२/११-अे, दि.२०.०३.२०१९
३. कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. सां/८.वि.ह.अनु./३९५/ २०१९, दि.१७.०७.२०१९

प्रस्तावना :-

प्रधानमंत्री पिक विमा ही योजना रब्बी हंगाम २०१८-१९ मध्ये फ्युचर जनरली इंन्शुरन्स कं.लि., बजाज अलायन्झ जनरल इंन्शुरन्स कं.लि. व भारती ॲक्सा इंन्शुरन्स कं.लि. या ३ विमा कंपनीमार्फत राज्यात राबविण्यात येत आहे. रब्बी हंगाम २०१८-१९ करीता केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री फसल विमा योजना या संकेतस्थळावरील शेतकरी सहभागाच्या दि.१२.०७.२०१९ रोजीच्या आकडेवारीनुसार रु.३९१,०७,४२,६०४/- इतकी रक्कम राज्य शासन हिस्सा विमा हप्ता अनुदान म्हणून देय होत आहे. आता, फ्युचर जनरली इंन्शुरन्स कं.लि., बजाज अलायन्झ जनरल इंन्शुरन्स कं.लि. व भारती ॲक्सा इंन्शुरन्स कं.लि. या ३ विमा कंपन्यांना प्रस्तुत प्रकरणी पिक विमा हप्ता अनुदानापोटी राज्य शासन हिश्याच्या स्वरुपात द्यावयाची रु.**२७०,७९,५१,९९०/-** इतकी रक्कम तसेच प्रशासकीय खर्चासाठी लागणारी रु.७५,१७,९४१/- अशी एकुण रु. २७१,५४,६९,९३१/- इतकी रक्कम वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रधानमंत्री पिक विमा योजना रब्बी हंगाम २०१८-१९ करीता फ्युचर जनरली इंन्शुरन्स कं.लि., बजाज अलायन्झ जनरल इंन्शुरन्स कं.लि. व भारती ॲक्सा इंन्शुरन्स कं.लि. या ३ विमा कंपन्यांनी केलेली मागणी, प्रधानमंत्री फसल विमा योजना या संकेतस्थळावरील शेतकरी सहभागाच्या दि.१२.०७.२०१९ रोजीच्या आकडेवारी आणि कृषि आयुक्तालयाची शिफारस या बाबींचा विचार करता राज्य हिस्सा पीक विमा हप्ता अनुदान म्हणून विमा कंपन्यांनी मागणी केलेली रु.**२७०,७९,५१,९९०/-** इतकी रक्कम तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत प्रशासकीय खर्चासाठी अनुज्ञेय असणाऱ्या २ टक्के निधीतून शासकीय मुद्रणालय कोल्हापूर छपाई देयक रु.४०,१७,९४१/- व प्रशासकीय खर्चासाठी लागणारी रु.३५,००,०००/- अशी एकुण रु.७५,१७,९४१/-इतकी रक्कम वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. संबंधित विमा कंपन्यांना यापुर्वी दिलेल्या व आता द्यावयाच्या पीक विमा हप्ता अनुदान राज्य हिस्सा अनुदानाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

विमा कंपनी	राष्ट्रीय पीक विमा संकेतस्थळावरील दिनांक १२.०७.२०१९ रोजी विमा कंपनच्या अहवालानुसार विमा हप्ता राज्य हिस्सा अनुदान रु.	विमा कंपनीने सादर केलेल्या देयकानुसार मागणी केलेली पीक विमा हप्ता राज्य हिस्सा अनुदान रु.	यापुर्वी अदा करण्यात आलेले अनुदान रु.	आता अदा करावयाचे उर्वरीत अनुदान रु.
बजाज अलायन्झ जनरल इंन्शुरन्स कं.लि	२४०,८७,७६,८९३/-	२३९,९२,४५,४१६/-	७०,०८,०६,३९०/-	१६९,८४,३९,०२६/-
भारती ॲक्सा इंन्शुरन्स कं.लि.	३८,५२,८३,५९१/-	३६,५७,३५,८८२/-	१०,५४,४५,२३०/-	२६,०२,९०,६५२/-
फ्युचर जनरली इंन्शुरन्स कं.लि.	१११,६६,८२,१२०/-	१०१,२९,३६,२८९/-	२६,३७,१३,९७७/-	७४,९२२२,३१२/-
एकुण मागणी	**३९१,०७,४२,६०४/-**	**३७७,७९,१७,५८७/-**	**१०६,९९,६५,५९७/-**	**२७०,७९,५१,९९०/-**

२. प्रस्तुत बाबींवर होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० करिता मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा :-

मागणी क्र. डी -३
२४०१ - पीक संवर्धन
११०, पीक विमा (००) (०८) प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत विमा हप्त्यासाठी अर्थसहाय्य राज्य हिस्सा (२४०१ A ६६४) योजनेतर

३. प्रस्तुत प्रयोजनार्थ सहायक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी तर कृषि संचालक (वि.प्र.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभाग परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.१४४/ अर्थ-३, दि.०१.०४.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. प्रस्तूत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१९१३३९१८०४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KIRAN N PATIL

Digitally signed by KIRAN N PATIL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=657661007c4f6885bf8deae62f13606632589e592d8c18ceb9a49bfd30471850, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=64a3950913946fa68fe576faead463fd8ae1e3844a820d921b663674927a476e, ou=AGRICULTURE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KIRAN N PATIL
Date: 2019.07.19 13:44:14 +05'30'

(डॉ. किरण पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२

२. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
३. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२
४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. संचालक (वि.प्र.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
८. सहाय्यक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१०.महालेखापाल, महाराष्ट्र -१/२, (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
११.वित्त विभाग (व्यय-१), मंत्रालय, मुंबई- ३२
१२.उप सचिव (११-अे /२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
१३.कक्ष अधिकारी (२- अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१४.विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी, स्टॉक एक्सचेंज टॉवर्स, २० वा मजला, दलाल स्ट्रीट,फोर्ट, मुंबई-४०० ०२३
१५.निवड नस्ती (कार्यासन ११-अे).